# गाव तेथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका जिल्हा परिषदेचा संकल्प

**गाव तेथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका जिल्हा परिषदेचा संकल्प-लोकसहभागातून 500 अभ्यासिकांची होणार निर्मिती.**

**नाशिक :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले असून 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले - गाव तेथे अभ्यासिका' हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील ५०० ग्रामपंचायतींमध्ये आधुनिक व सुसज्ज अभ्यासिकांची उभारणी करण्यात येत आहे.

ग्रामीण परिसरात स्पर्धा परीक्षा किंवा उच्च शिक्षणाच्या तयारीसाठी आवश्यक शांत व सुरक्षित अभ्यासस्थळांची कमतरता जाणवते. घरातील कामे, संसाधनांचा अभाव आणि शहरातील निवास-प्रवासाचा वाढता खर्च यामुळे अनेक विद्यार्थी मोठ्या अडचणीतून शिक्षण पूर्ण करतात. याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेने लोकसहभाग व सीएसआर निधीचा वापर करून अभ्यासिका उभारण्याचा संकल्प केला आहे. दानशूर नागरिक, सामाजिक संस्था, राष्ट्रीय-बहुराष्ट्रीय कंपनी यांनी पुढाकार घेऊन या अभ्यासिकांच्या निर्मितीसाठी मदत करावी असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना स्वतःच्या गावातच अभ्यासासाठी हक्काचे, सुरक्षित, निशुल्क आणि प्रेरणादायी ठिकाण उपलब्ध होणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी, विशेषतः शेतकरी व शेतमजुरांच्या मुलांना, मर्यादित जागेत किंवा झाडाखाली बसून अभ्यास करावा लागतो. मुलींना तर घरातील जबाबदाऱ्यांमुळे पुरेसा वेळ मिळत नाही आणि स्पर्धा परीक्षांची स्वप्ने अनेकदा अपुरीच राहतात. या अभ्यासिकांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला नवा वाव मिळून त्यांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल होणार आहे.

**चौकट** - उपक्रमाला प्रशासकीय अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. चांदोरी ग्रामपंचायतीने सर्वप्रथम लोकसहभागातून अभ्यासिका उभारून आदर्श ठेवला. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांनीही या उपक्रमाची पाहणी करून कौतुक केले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे यांनी निफाड तालुक्यातील खेरवाडी येथे, तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सोमपूर येथे अभ्यासिका स्थापनेत योगदान दिले आहे. पोलिस उपअधीक्षक प्रकाश गायकवाड यांनी ढकांबे येथे आणि लेखाधिकारी विष्णु वारंगूसे यांनी बेलगांव क-हाळे येथे अभ्यासिका उभारण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत.

आपण इमारती, भौतिक साधनसंपत्ती उभारत असतो; परंतु खरा समाज विकास तेव्हाच शक्य जेव्हा माणूस घडतो. मी स्वतः ग्रामीण भागातील संघर्ष अनुभवलेला आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे हीच खरी समाजबांधणी. प्रत्येक गावाने अभ्यासिका उभारण्याचा पुढाकार घेतला तर या ठिकाणांमधून उद्याचे प्रशासनिक अधिकारी, लेखक, कवी आणि विचारवंत तयार होतील. यासाठी नागरिकांनी देखील अभ्यासिका निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा.

*** ओमकार पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक**